आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ मे २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराची सांगता, राज्यातल्या १३ जागांवर सोमवारी मतदान
- वंशवाद आणि देशाला कमजोर करणाऱ्या शक्तींचा पराभव करण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- सत्तेत आल्यावर देशातल्या सर्व जातीधर्मांच्या संस्था आणि वास्तूंचा सन्मान करण्याची इंडिया आघाडीची ग्वाही
- आपच्या खासदार स्वाती मालिवाल यांना मारहाण प्रकरणी अरविंद केजरीवाल यांच्या सहाय्यकाला अटक

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीची भारतीय जोडी अंतिम फेरीत, महिला दुहेरीची जोडी उपांत्य फेरीत पराभूत

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराची आज सांगता झाली. या टप्प्यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघात मतदान होणार आहे. त्यात उत्तर प्रदेशातल्या १४, पश्चिम बंगालमधल्या ७, ओडिशा आणि बिहारमधल्या ५, हिमाचल प्रदेशातल्या ३ आणि जम्मू-काश्मिर तसंच लडाखमधल्या एक-एक जागेचा समावेश आहे.

राज्यातल्या शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराचीही आज सांगता झाली. राज्यात आज मुंबईतल्या सर्व ६ जागा यांच्यासह ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या १३ लोकसभा मतदारसंघात सोमवारी मतदान होणार आहे. या टप्प्यातल्या मतदानासाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या १३ मतदारसंघांत दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत, तर २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्वाधिक ३१ उमेदवार नाशिकमध्ये तर सर्वात कमी १० उमेदवार दिंडोरी आणि पालघरमध्ये आहेत.

**<><><><><>**

वंशवाद आणि देशाला कमजोर करणाऱ्या शक्तींचा पराभव करण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते. देशात स्थिर सरकार गरजेचं आहे. गेल्या ७० वर्षांपासून पाकिस्तान भारताला त्रास देत होता. पण, आता ते काही करायच्या आधी शंभर वेळा विचार करतात, असा दावाही नरेंद्र मोदी यांनी अंबाला इथल्या सभेत केला.

काँग्रेसने शेतकऱ्यांचे ६० हजार कोटी रुपये थकवले होते. पण, भाजपा सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात साडे पाच लाख कोटी रुपये थेट हस्तांतरीत केले, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

महायुतीच्या राज्यात गेल्यावेळेपेक्षा जास्त जागा निवडून येतील असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता झाल्यावर त्यांनी शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचं दर्शन घेतलं. त्यानंतर ते बोलत होते. आपल्याला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे महायुतीचा विजय निश्चित त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षांत २५ कोटी जनतेला गरीबीतून बाहेर काढणाऱ्या मोदी सरकारच्या उपक्रमांचे जगभरातल्या महत्त्वाच्या अर्थतज्ञ आणि आर्थिक कंपन्यांनी कौतुक केले आहे, असं भाजपचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह म्हणाले. उत्तर प्रदेशातल्या बस्ती जिल्ह्यात भाजप उमेदवाराच्या प्रचारार्थ रॅलीमध्ये ते बोलत होते. भाजपने कधीही जनतेची दिशाभूल केली नाही, याउलट पक्ष नेहमीच जनतेला प्रामाणिकपणे सामोरा गेला आहे, असं ते म्हणाले.

गृहमंत्री अमित शहा यांनी आज झाशी इथं प्रचारसभा घेतली. निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यापर्यंत भाजपने २७० जागांचा टप्पा ओलांडला आहे आणि पाचव्या टप्प्यानंतर ३०० जागांकडे घोडदौड सुरू केली आहे, असा दावा त्यांनी केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर त्यांनी घराणेशाहीचा आरोप केला. भाजप उमेदवार स्मृती इराणी यांच्या प्रचारासाठी शहा आज अमेठीत रोड शो घेणार आहेत.

**<><><><><>**

देशातल्या सर्व जातीधर्माच्या सर्व संस्था आणि वास्तूंचा सन्मान आमचं सरकार करेल, असं आश्वासन इंडिया आघाडीचे नेते शरद पवार यांनी आज मुंबईत दिलं. इंडीया आघाडीच्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. अयोध्येतील राम मंदिराचं बांधकाम अपूर्ण असून आम्ही सत्तेत आल्यानंतर ते पूर्ण करू अशी ग्वाही उद्धव ठाकरे यांनी दिली. इंडिया आघाडीचं सरकार सत्तेत आलं तर ते राम मंदिर पाडतील, असा आरोप प्रधानमंत्र्यांनी कालच्या सभेत केला होता. त्यावर ते बोलत होते. याविषयावर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे म्हणाले, बुलडोजर ही आमची संस्कृती नाही. प्रधानमंत्री लोकांची दिशाभूल करण्यासाठी ही वक्तव्य करत आहेत.

संविधानानं दिलेलं आणि आर्थिक मागासांना दिलेलं आरक्षण कायम ठेवण्यासोबत राज्याराज्यातून आलेल्या आरक्षणांच्या प्रस्तावावर संबंधित आयोगांच्या शिफारसींनुसार योग्य निर्णय घेऊ असं आश्वासनही खरगे यांनी दिलं. आम्ही UPA सरकारच्या काळात देशात अन्न सुरक्षा कायदा आणला आहे. पुन्हा सत्तेत आल्यावर १० किलो धान्य मोफत देऊ आणि GST चा एकच दर लागू करू, असंही ते म्हणाले. सध्या निवडणूक जनतेची असून जनता ती लढते आहे. त्यामुळे राज्यातल्या ४८ पैकी सुमारे ४६ जागा महाविकास आघाडीला मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ४ जून पासून या देशात इंडिया आघाडीचे सरकार येईल आणि खऱ्या अर्थाने अच्छेदिन सुरू होतील, असं उद्धव ठाकरे म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीत प्रधानमंत्री पदाचा चेहरा ठरला आहे. त्यासाठी आमच्याकडे अनेक जण असल्याचे ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आम आदमी पक्षाच्या खासदार स्वाती मालिवाल यांच्याशी केलेल्या कथित गैरवर्तन प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे सहाय्यक विभव कुमार यांना आज दिल्ली पोलिसांनी अटक केली. केजरीवाल यांच्या निवासस्थानी १३ मे रोजी विभव कुमार यांनी आपल्याशी गैरवर्तन आणि छळ केल्याचा आरोप करत मालिवाल यांनी तक्रार दाखल केली होती. विभव कुमार यांनीही मालिवाल यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. घटना घडली त्या दिवशी मालिवाल यांनी केजरीवाल यांच्या निवासस्थानी बेकायदा प्रवेश केल्याचा आरोप विभव यांनी केला आहे.

दरम्यान, आपचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी भाजप आपविरोधात सूडबुद्धीने कारवाई करत असल्याचा आरोप केला. भाजप मुख्यालयासमोर उद्या आपचे नेते जेल भरो आंदोलन करणार असल्याची माहिती केजरीवाल यांनी दिली.

**<><><><><>**

फळे कृत्रिमरीत्या पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या प्रतिबंधाचं काटेकोरपणे पालन करण्यासाठी, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं व्यापारी, फळे हाताळणारे आणि खाद्य व्यावसाईकांना सतर्कतेची सूचना केली आहे. FSSAI राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा विभागांना सतर्क राहण्याचा आणि अशा बेकायदेशीर कामांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींवर कडक कारवाई करण्याचा सल्ला, प्राधिकरणानं दिला आहे.

कॅल्शियम कार्बाइड, सामान्यतः आंब्यासारखी फळे पिकवण्यासाठी वापरली जातं, ते ॲसिटिलीन वायू सोडतं. त्यामध्ये आर्सेनिक आणि फॉस्फरसचे अंश असतात. त्यामुळे चक्कर येण्यासह अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. या धोक्यांमुळे फळे पिकवण्यासाठीच्या कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर अन्न सुरक्षा आणि मानक विनियम, २०११ अंतर्गत बंदी घालण्यात आली आहे. मात्र FSSAI नं भारतात फळे पिकवण्यासाठी सुरक्षित पर्याय म्हणून इथिलीन गॅसचा वापर करायला परवानगी दिली आहे.

**<><><><><>**

बँकॉकमध्ये थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रँकीरेड्डी यांनी पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. अंतिम फेरीत त्यांचा सामना तैवानच्या लिऊ यी आणि चीनच्या चेन बोयांग यांच्याशी होईल. उपांत्य फेरीत त्यांनी एमसी लू आणि तांग काई वेई या तैवानच्या जोडीवर २१-११, २१-१२ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. महिला दुहेरीत भारताच्या तनिषा कॅस्ट्रो आणि अश्विनी पोनप्पा या जोडीला थायलंडच्या संघाकडून मात्र पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

राजस्थानात सर्वत्र सध्या तीव्र उष्णतेची लाट पसरली असून अनेक ठिकाणचे तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले जात आहे. बारमेर इथं आज सर्वाधिक म्हणजे ४६ पूर्णांक ९ अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. त्या खालोखाल पिलानी इथं ४६ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस तर जैसलमेर, करावली,

गंगानगर आणि जालोर इथं ४६ पूर्णांक २ अंश सेल्सिअस तापमान होतं. बऱ्याच ठिकाणी रात्रीचं तापमानही ३० अंश सेल्सिअसहून अधिक असल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा आणि चैन्नई सुपर किंग्स यांच्यातला सामना पावसामुळं थांबला आहे. त्यापूर्वी बेंगळुरूच्या ३ षटकात बिन बाद ३१ धावा झाल्या होत्या. बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडिअमवर हा सामना सुरू आहे. चैन्नई सुपर किंग्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><>//**